मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

संपादक : तुषार गायकवाड

कार्यकारी संपादिका रुबिना मुल्ला :9890879757

RNI No. MAHMAR/2016/72543

वर्ष ५वे | अंक : ४४ | रविवार,दि.२५ फेब्रुवारी ते शनिवार ०२ मार्च २०२४ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४




पान २ — संपादकीय — प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा..

पान ३ — वडील वारल्यानंतर भाऊ...

पान ४ — कोणाच्या जीवावर अतिरिक्त आयुक्त..


## जूचंद्र येथील स्वयंघोषित समाजसेवक अनधिकृत बांधकामे उभारून करतोय बक्कळ पैश्याची उलाढाल?




शहरात होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना आळा लावण्याऐवजी पालिका प्रशासन अनधिकृत बांधकामाच्या मुळाला पाणी घालण्याचं काम पार पाडत आहे.अनधिकृत बांधकाम ही समस्या शहराला काँक्रीटच्या जंगलात रूपांतर करीत आहे.वसई विरार शहरात बहुतांश वन विभागच्या आणि आरक्षित भूखंड बांधकाम व्यवसायिकांडून गिळंकृत करण्यात आलेले आहेत.याची कोणतीही खबरदारी न घेता भ्रष्टाचाराचे धोरण अवलंबून पालिका अधिकारी विकले गेलेले आहेत.महापालिका महसूल दृष्टीने अनधिकृत बांधकामे होणे आवश्यक आहे परंतु दलाल पालिका अधिकारी पालिकेचा

## नोटीसीनंतरही प्रभाग समिती डी चे सहा.आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस यांचे बेकायदेशीर बंगले सही सलामत?

प्रभाग समिती आय हद्दीत होळी परिसरात रमेदी, घोगाळेवाडी येथे मौजे सांडोर सर्वे नं ९९/३/१ या जागेवर ४ बंगल्यांचे बांधकाम करण्यात आले आहे.

सहा.आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस यांनी नोटीशी ला उत्तर देताना सांगितले आहे की सदरची मालमत्ता अनधिकृत बंगल्यासह मूळ जमीन मालकांकडून खरेदी केली आहे.

एकीकडे पालिका प्रशासन नागरिकांना घर खरेदी करताना पालिकेच्या नगररचना विभागकडे शहानिशा करण्याचा सल्ला देत असताना सहा.आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस हे स्वतः पालिकेत अधिकारी असताना अनधिकृत बंगले असलेली मालमत्ता कशी खरेदी केली. विशेष म्हणजे पालिका प्रशासनाच्याच भाषेत बोलायचे झाले तर सदरची मालमत्ता अनधिकृत असताना संबंधित जमीन मालकावर आजपर्यंत नियमानुसार गुन्हा का दाखल झाला नाही.

मध्यंतरी पालिकेच्या प्रभाग समिती ई द्वारा विकासक, जमीन मालक इमारती बांधून फरार झाल्याने सदनिका धारकांना एमआरटीपी कायद्यानुसार नोटिसा जारी करून इमारती तोडण्याच्या धमक्या देण्यात आल्या होत्या.


आता सदरचा नियम सहा.आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस यांच्या बेकायदेशीर बंगल्यासाठीही पालिका आयुक्तांनी लागू करावा.

## सक्तीच्या रजेनंतर वादग्रस्त सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांची वसई विरार पालिकेत वर्णी..

विरार/प्रतिनिधी-ठाणे महापालिकेच्या कळवा प्रभागातील अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिल्याच्या ठपका ठेवून ठाणे महापालिका प्रशासनाकडून सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आलेल्या वादग्रस्त सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांना शासनाने वसई विरार पालिकेत प्रतिनियुक्तीवर पाठविले आले आहे.दुसरीकडे सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या सारख्या भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या वादग्रस्त अधिकाऱ्याची वसई विरार पालिकेत वर्णी लागल्याने वसई विरार मधील सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांचा ठाणे महापालिकेतील कार्यकाळ वादग्रस्त राहिला आहे. ठाणेकर यांना ठाणे महापालिकेच्या कळवा प्रभाग समितीची जबाबदारी सोपविण्यात आली होती.परंतु कळवा प्रभाग समितीत कार्यरत असतानासहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्यावर अनेकदा भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते.शिवाय

ठाणे मनपाच्या कळवा प्रभागातील



स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
मुख्य कार्यालय विरार विरार (पु)
ता. वसई, जि. पालघर - ४०१३०५

दूरध्वनी : 0250-2525101/02/03/04/05/06
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com
जावक क्र. वविशमन/आस्था/२०४/२०२४
दिनांक -१२/२/२०२४

आदेश

प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सहाय्यक आयुक्त/ प्र.सहा. आयुक्तांची बदलीने नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्या कार्यरत विभाग | बदलीने पदस्थापनेचा विभाग |
|---|---|---|---|
| १ | श्री.सुबोध ठाणेकर | शासनाकडून नविन नियुक्ती | सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती "आय", वसई |
| २ | श्री. ग्लिसन घोन्सालविस | प्रभाग समिती आय, वसई | प्र.सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती "डी", आचोळे |

वरील आदेश मिळताच संबंधित उपायुक्त व अतिरिक्त आयुक्त यांचेशी त्वरीत संपर्क करून त्यांचे निर्देशानुसार कामकाजास सुरुवात करावी. तसेच या कामी कोणतीही सबब विचारात घेतली जाणार नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास या विनापरवानगी परस्पर रजेवर गेल्यास शिस्तभंगाची कारवाई करणत येईल,याची नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार)

(रमेश मनाळे)
अतिरिक्त आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रत :
१. श्री.सुबोध ठाणेकर,सहाय्यक आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका.
२. श्री. ग्लिसन घोन्सालविस, प्र.सहा.आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका.

प्रत : माहितीस्तव.
१.अतिरिक्त आयुक्त (दक्षिण)
२.मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३.मुख्य लेखा परिक्षक.
४.उप-आयुक्त (सर्व).
५.प्र.सहा. आयुक्त (सर्व)
६.आस्थापना निवडनस्ती.

अनधिकृत बांधकाम प्रकरणी भाजपचे आमदार संजय केळकर तसेच स्थानिक आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नागपूर येथील अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडत सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्यावर कारवाईची मागणी करण्यात आली होती.याच लक्षवेधीवर उत्तर देतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यासह राज्यातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे तसेच अशा बांधकामांना अभय देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईचे आदेश प्रशासनाला दिले होते.त्याचबरोबर अशी बांधकामे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचेही संकेत त्यांनी दिले होते.मुख्यमंत्र्यांच्या या आदेशानंतर ठाण्याचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांनी निलंबनाऐवजी सक्तीच्या रजेवर पाठवून कारवाईचे सोपस्कार पार पाडले होते.दरम्यान सहा.सक्तीच्या रजेवर असलेले सहा.आयुक्त सुबोध ठाणेकर वसई विरार पालिकेत प्रतिनियुक्तीवर रुजू झाले असून प्रभाग समिती आय तसेच ई प्रभागाचा अतिरिक्त पदभारही सोपविण्यात आला आहे.

# संपादकीय...!

## प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा..

पुण्याला खासदार नाही, याला जवळपास आता एक वर्ष पूर्ण होईल. पुढील महिन्यात लोकसभेच्या निवडणुका जाहीर होतील आणि त्यानंतर यथावकाश पुण्याला खासदार मिळेलच. महापालिकेतील नगरसेवक आणि खासदार यांच्याकडून अपेक्षित कामांमध्ये मूलभूत फरक आहे, हे पुणेकरांनी आणि संभाव्य उमेदवारांनी समजून घ्यायला हवे. तरच, पुण्याचा खासदार दिल्लीत यशस्वी ठरू शकेल.शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते. दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की ‘खासदार खरेच कामाचा आहे,’ अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे.कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन-तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री-मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही अडचणी असल्यास त्या सोडविणे; अन्यथा थेट संसदेमध्येच प्रश्नोत्तरे, चर्चा या माध्यमातून आवाज उठविणे, अशा विविध माध्यमांतून मतदारसंघातील विकासकामांना गती देता येऊ शकते. या पद्धतीने काम करणाऱ्या खासदारांची संख्या काही कमी नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.

## जूचंद्र येथील स्वयंघोषित समाजसेवक... पान नं.१ वरुन

महसूल स्वतःच्या खिश्यात टाकून मोकळे झालेले आहेत.त्यामुळे शहराचा विकास खुंटीला लागला आहे.तसेच आयुक्त अनिल कुमार पवार नेहमी अनधिकृत बांधकाम या विषयांकडे पाठ फिरवतात त्यामुळे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले त्यांच्या गैरहजेरीत हेरा फेरी करत बसतात.अशी कुजबुज जनतेत सुरु आहे.

प्रभाग जी मधील अनधिकृत बांधकामामध्ये अतिरिक्त आयुक्त यांच्या भागीदारीचा वाटा असल्याचे मागील वृत्तात प्रसिद्ध केले गेले होते.त्याला अनुसरून आजही अतिरिक्त आयुक्त जनाची ना मनाची लाज न राखता ‘जैसे थे’ मनमानी कारभार अजूनही चालवत आहेत.आम्ही दिलेल्या तक्रारी नुसार मुबंई अहमदाबाद महामार्गावरील बाफाने येथील रेल्वे ब्रिज जवळ मोठ्या संख्येने अनधिकृत इंडस्ट्रीयल बांधकाम सुरू असून लवकरात लवकर कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.पण अतिरिक्त आयुक्तांना वरील ठिकाणी कारवाई करण्यात काडीचा रस नसल्याचे उमजून आले आहे.त्यामुळे त्यांच्या अश्या वागण्याने असे साध्य होत असावे की,रक्कम वसूल झालेली आहे त्यामुळे मुद्दामून या विषयांवर दुर्लक्ष केले जात आहे.अतिरिक्त आयुक्तांच्या प्रवृत्ती मुळे बाकी इमानदार पालिका अधिकारीही त्यांच्या भ्रष्टाचाराच्या अमिषात अडकत चालले आहेत.वरील ठिकाणी स्वयंघोषित समाजसेवक विख्यात विकासक आपण वर पर्यत पैसे चारतो असे छाती ठोक पणे सगळीकडे सांगत फिरत आहे.येथील विकासकाचे दोन खास फॅन्टर आहेत.एक विजय नडगे तर दुसरा लिपिक सुनील टेलगुते हे दोघे आहेत.बाकी पालिका अधिकारी वर्गाशी मतलब न ठेवता डायरेक्ट अतिरिक्त आयुक्तांना हे दोघे रिपोर्ट देतात अशी चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.मोठं मोठ्या अनधिकृत बांधकामाची वसुली करून सुद्धा लिपिक विजय नडगे आणि लिपिक सुनील टेलगुते यांना चाळीची ही बांधकाम वसुली हवी असते.म्हणतात ना ते भिकार्याला सोन्याचं भांड दिले तरी तो भिकच मागणार अशी काहीशी गत आहे.अतिरिक्त आयुक्तांनी सहआयुक्त मनाली शिंदे यांना खेळण्यातील बाहुली बनवून सर्व कारभार विजय आणि सुनील यांच्या खांद्यावर दिला असल्याचे जनमानसात बोलले जात आहे.

## एक हप्त्यात एकूण १५ ते २० रुम-गाळे अनधिकृत बांधकामे मागूर्ली पाड्यात उभी राहत असून महापालिका प्रशासन मात्र झोपेत?

## मागूर्ली पाड्यातील बांधकाम व्यवसायिकांसमोर प्रभाग जी च्या अधिकाऱ्यांनी गुडघे टेकले आहेत ?

गाव मौजे राजीवली येथील सर्वे क्र १२३,१२४,१२५ मागूर्ली पाडा याठिकाणी नव्याने अनधिकृत बांधकामे उभी राहत असून महापालिका प्रशासन मात्र आपली भूमिका स्पष्ट करत नसून येथील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यापासून टाळा टाळ करत आहे.रीतसर अर्ज देऊन सुद्धा प्रभाग जी चे अधिकारी सुस्त कारभार चालवत आहेत.प्रभाग जी च्या सहआयुक्त मनाली शिंदे यांनी आपल्या डोळ्यावर काळी पट्टी बांधल्याने त्यांना कोणत्याही प्रकारच सोयर सुतक उरलेले नाही.सम्पूर्ण विषय आपल्याला माहीत असून लवकरच कारवाई होईल अशी भाकड आश्वासन प्रभाग जी च्या अधिकाऱ्यांकडून देण्यात येतात परंतु परिणामी कारवाई मात्र शून्य होत असल्याचे दिसून येत आहे.या गेल्या सात दिवसात मागूर्ली पाडा याठिकाणी सुमारे १५ ते २० रूम-गाळे अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत.त्यामुळे असेच चालू राहिले तर येणाऱ्या १ महिन्यात याठिकाणी अनधिकृत बांधकामे बखास झालेली पाहायला मिळतील हे नक्की झाले आहे.



युनिटी मिडीया प्रेस क्लब

सर्व पत्रकारांनी सामिल व्हा- रुबीना मुल्ला (अध्यक्षा)

# ‘वडील वारल्यानंतर भाऊ हक्कसोड मागायला आला, पण मी वारसा हक्क मिळवून दाखवला’

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या महिला आपला जाहीरनामा सादर करत आहेत. आदर्श समाजासाठी एक आदर्श जाहीरनामा कसा असावा याचा वस्तूपाठ या महिलांनी आपल्या कार्यातूनच दिला आहे. अशा महिलांची ओळख तुम्हाला या मालिकेतून आम्ही करुन देत आहोत.‘गावात चर्चा सुरू झाली, मुलीनं प्रॉपर्टी मागणं पाप असतं. आमच्याही बहिणी प्रॉपर्टी मागायला लागतील ही त्यांना भीती होती,’ रुक्मिणी सांगत होत्या.

सगळं व्यवस्थित सुरू असताना २०११ मध्ये एक घटना घडली आणि रुक्मिणी यांचं आयुष्यच बदलून गेलं.

रुक्मिणी सांगतात, ‘२०११ ला माझा मोठा मुलगा बारावीला आणि छोटा आठवीला होता. आम्ही पत्र्याच्या शेडमध्ये राहत होतो. परीक्षेमध्ये मुलांना अडथळा नको म्हणून आपण घर नंतर तयार करू, असं माझे मिस्टर म्हणाले, पत्र्याचंच शेड करायचं होतं.

’पण, २०११ साली २ मे रोजी माझे मिस्टर काम करत असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आला आणि त्यांचं निधन झालं.’

पतीच्या निधनानंतर कसोटीचा काळ

पतीच्या निधनानंतर रुक्मिणी यांची दुनियाच बदलली. त्यांच्याच भाषेत सांगायचं तर, सगळ्या नातेवाईकांचे रंगरुप बदलले. २०१६ मध्ये वडिलांचं निधन झालं आणि तेव्हाच भाऊ पहिल्यांदा भेटायला आला, असं रुक्मिणी सांगतातरुक्मिणी यांनी संघर्ष करुन माहेरच्या संपत्तीतला त्यांचा वाटा कसा मिळवला हे अनेक महिलांसाठी दिशादर्शक ठरत आहे, त्याचीच ही कहाणी.

४७ वर्षांच्या रुक्मिणी नागापुरे बीडमध्ये राहतात. त्यांचं घर म्हणजे अगदीच पत्र्याचं शेड. पण आत पाऊल टाकताच समोर सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिवाजी महाराज यांचे फोटो दिसतात.

रुक्मिणी यांचं वयाच्या १३ व्या वर्षी लग्न झालं आणि १५ व्या वर्षी त्यांना पहिलं अपत्य झालं. आणि तीन वर्षांत तिसरं अपत्य झालं.‘२०१६ मध्ये माझ्या वडिलांचं निधन झालं. माझ्याकडे त्याचे काही पैसे होते. मी न बोलवता म्हणजे २०११ पासून २०१६ पर्यंत मला गरज होती त्याची, तोपर्यंत तो उभा राहिला नाही. मी अगदी जमीनदोस्त होते. माझ्या डोक्यावर छतपण नव्हतं. बाहेरचे चार-दोन लोक मजुरी म्हणून आणले आणि शेड बांधून घेतलं. तरीही कुणी आलं नाही.’‘पण ज्यावेळेस वडील वारले त्यावेळेस त्याला कळलं की माझ्याकडे यायला पाहिजे. का तर तो हक्कसोड करण्यासाठी माझ्याकडे मदत मागत होता. त्याच्यावर सही कर म्हणून. पण मला त्यातलं तेव्हा काहीच समजत नव्हतं.

’मला फक्त एवढं वाटत होतं की, माझा त्याच्याकडे पैसा आहे, तेवढा त्यानं मला द्यावा. मग मी त्याला सही देईल,’ रुक्मिणी पुढे सांगतात.

’आम्ही दोघी, आई जिवंत... तरीही’

त्यानंतर भावानं तलाठी आणि पोलीस पाटलच्या संगनमतानं सातबारा उताऱ्यावर वारस म्हणून स्वतःचं नाव लावून घेतल्याचं रुक्मिणी सांगतात.

’त्यानं तलाठी आणि पोलीस पाटलाच्या संगनमतानं एकट्याच्याच नावावर जमीन करुन घेतली. वारसा हक्कानी मी, माझी, बहीण, मुलगा म्हणून तो आणि माझी आई अशा चार जणांच्या नावे ती जमीन व्हायला पाहिजे होती. पण तशी झाली नाहीसातबारा उतारा पाहिल्यानंतर त्याच्यावर फक्त वारस म्हणून भावाचं नाव लागल्याचं रुक्मिणी यांना दिसून आलं आणि त्यांनी तलाठ्याला फोन लावला.‘मी तलाठ्याला फोन याच्यासाठी लावला, कारण की, २०१६ पासून मी संघटनेत काम करत होते. संघटनेत मी जेव्हा काम करायला लागले, तेव्हा मला संविधान माहिती झालं. संविधानामध्ये जी काही मूल्यं आहेत, म्हणजे सगळ्यांना समान अधिकार आहेत, हक्क आहेत ते कळालं. माझी स्वतःची मला एक ओळख व्हायला लागली. आणि मग त्याच्यामधून मला सगळ्या गोष्टी कळायला लागल्या.

‘मी तलाठ्याला फोनवर विचारलं की हे फक्त एकट्या भावाच्याच नावावर कसं काय केलं? आम्ही दोघी बहिणी आहोत, माझी आई अजून जिवंत आहे. मग तू कुठली कागदपत्रं त्याला जोडलेस? माझी आई तर जिवंत आहे, मृत्यूपत्र जोडलंय का? तर ते मला दाखव. आम्ही दोघींनी कुठं सह्या केल्या ते दाखव म्हटलं.’

‘मग तो तलाठी डायरेक्ट माझ्याकडे आला. तो पहाटे सकाळच्या ६ वाजता आला. माझा मुलगा झोपलेला होता तर तो झोपेतून उठला. तलाठ्यानं अक्षरशः माझे पाय धरले आणि माझी माफी मागितली.’‘मुलीनं संपत्तीत हक्क मागणं हे पाप’

पण हे प्रकरण इथंच थांबलं नाही. रुक्मिणी प्रॉपर्टीत अधिकार मागायला लागल्यावर त्याची गावात चर्चा सुरू झाली आणि गावातील ‘प्रस्थापित’ लोक रुक्मिणी यांच्या घरी आले.

रुक्मिणी सांगतात, ‘गावातील काही प्रस्थापित लोक माझ्या घरी आले आणि मला समजून सांगू लागले, की तू असं करू नको. मुलीनं प्रॉपर्टी नाही घेतली पाहिजे. तुला माहेरी-येण्याजाण्याचा रस्ता होईल. तुमचं नातं तुटेल.

’गावामध्ये चर्चा सुरू झाली की, मुलींनी घ्यायला नाही पाहिजे, हे पाप असतं किंवा वाईट होतं. तुझ्यामुळे आमच्याही महिला, आमच्याही बहिणी आम्हाला मागायला लागतील हीपण त्यांना एक भीती होती.’२०२२ मध्ये सातबाऱ्यावर वारसा हक्कात भावासोबतच रुक्मिणी, त्यांची बहीण, आई यांचं नावंही लावण्यात आलं.

रुक्मिणी गेल्या ८ वर्षांपासून एकल महिला संघटनेत काम करतात. या माध्यमातून त्या एकल महिलांना त्यांचे हक्क, अधिकार यांची माहिती करुन देतात. त्यासाठी विवाह नोंदणीचं महत्त्व समजून सांगतात. सातबारा वाचनासारखे उपक्रमही घेतात.

पतीच्या निधनानंतर संघटनेशी जोडलं गेल्यामुळे अनेक एकल महिला आता अधिकार मिळवू लागल्या आहेत.

इतर महिलांचा वारसा हक्क आणि शिक्षणासाठीचा संघर्ष

यापैकी एक आहेत अयोध्या जगताप. अयोध्या यांच्या पतीचं २०१६ मध्ये कर्करोगानं निधन झालं.

बीबीसी मराठीशी बोलताना त्या म्हणाल्या, ‘मी असंच दारातून जायची-यायची. रुक्मिणी ताई बोलायच्या मला, विचारायच्या. तुम्ही अशा का फिरता? कुठे जाता? काय करता? मी त्यांना माझ्याविषयी सांगितलं. त्या म्हणल्या संघटनेत या. मग मी त्यांच्या संघटनेत आले. माझ्यात बोलण्याची अशी हिम्मतही नव्हती.

’पण त्यांच्याशी जोडून राहिल्यामुळे माझ्यात अशी बोलण्याची हिम्मत आली. सासरची माझी जागा होती, शेती होती. ती मी माझ्या नावावर करुन घेतली. यांच्यामुळे माझ्यात घरच्यांसोबत बोलण्याची हिम्मत आली.’सपना अहिरे या बीडला लागूनच असलेल्या कालवण गावात राहतात. त्यांच्या पतीचं अपघातात निधन झालं. त्यानंतर त्यांचा संपर्क एकल महिला संघटनेशी झाला.

त्या सांगतात, ‘मॅडमनी मला बऱ्याच गोष्टी समजून सांगितल्या की, तुला मुलं आहेत. तु कसं करणार? पुढची लाईफ कशी काढणार? मग मी त्यामधून बाहेर निघायला लागले. बीए.ला अडमिशन घेतला. ग्रॅज्युएशन तर सगळ्यांचेच होत आहे, त्याला काही अर्थ दिसत नाही म्हटल्यावर मी नर्सिंगला ॲडमिशन घेतलं. नर्सिंगला ॲडमिशन घेतल्यानंतर दोन्ही वर्षं एकदम टॉपमध्येच पास झाले मी अभ्यास करुन.’

सपना सध्या खासगी दवाखान्यात नोकरी करतात. दुसरीकडे, लग्नाच्या वेळी आठवीत असलेल्या रुक्मिणी यांनी आता एम.ए पूर्ण झालंय. अजूनही वही-पेन सोडला नसल्याचं त्या सांगतात. महापुरुष, स्त्री-पुरुष समानता याविषयीचे त्यांचे अनेक लेख स्थानिक वर्तमानत्रांत छापून आले आहेत.

सरकारकडे मागण्या

रुक्मिणी यांना सरकारकडून काही मागण्या आहेत-

महिलांच्या नावावर घर आणि शेती करण्यासाठी दोघांचं पती-पत्नी म्हणून नाव लावलं पाहिजे.

वारसा हक्क कायद्याची अंमलबजाणी

विवाह नोंदणी कायद्याची अंमलबजावणी

एकल महिलांची ग्रामपंचायतला स्वतंत्र नोंद करायला पाहिजे. कायदेशीर एकल महिलांची नोंद केली तर त्याच्यात विवाहित किती, विधवा किती, परित्यक्त्या किती, घटस्फोटित किती हा आकडा त्याठिकाणी येईल आणि त्यांना तसे कायदेशीर प्रमाणपत्र मिळेल.

त्या प्रमाणपत्राच्या आधारे त्या महिलेला शासनाच्या योजना मिळवण्यासाठी फायदा होईल.

देशभरात काय चित्र?

हिंदू वारसा हक्क कायद्यामध्ये २००५ साली सुधारणा करण्यात आली. वडील किंवा मुलगी हयात असो वा नसो मुलींचा वडिलांच्या संपत्तीवर समान हक्क आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑगस्ट २०२० पुन्हा एकदा स्पष्ट केलं. त्यापुढे जाऊन कोर्टानं आता हा कायदा येण्याच्याआधीच्या प्रकरणांमध्येसुद्धा महिलांना समान वाटा मिळेल, अशी भूमिका घेतली.

महिलांच्या नावावर जमीन करुन देण्यास अनेकदा पुरुष प्रधान समाज तयार होत नाही. एखाद्या सरकारी योजनेचा लाभ मिळवायचा असेल तर महिलेच्या नावावर थोडी जमीन करुन दिली जाते.

आकडेवारीचा विचार केला तर, जगभरात केवळ १२ ते १३ % महिलांच्या नावावर जमीन असून भारतात ती १३ % महिलांच्या नावावर असल्याचं कोरो इंडियाच्या अमिता जाधव सांगतात. त्या गेली अनेक वर्षं महिलांच्या संपत्ती हक्काविषयी काम करत आहेत.अमिता यांच्या मते, ‘वारसा हक्कानं महिलांना वडिलोपार्जित मालमत्तेत अधिकार दिला आहे. तसेच सासरच्या प्रॉपर्टीतही अधिकार दिलेला आहे. पण प्रॉपर्टी माहेरची असो की सासरची, ती महिलेच्या नावावर करण्याची मानसिकता दिसत नाही. महिलेकडून हक्कसोड प्रमाणपत्र घेतलं जातं. जी की अगदीच सोपी प्रक्रिया आहे. कधीकधी घरचे तयार असले तरी महिलेच्या नावावर जमीन करुन देण्यास शासकीय यंत्रणा अडथळे आणते.’

वडिलांच्या मृत्यूनंतर प्रत्येक वारसाची नोंद घेणे, विवाह नोंदणी कायद्याची अंमलबजावणी व्यवस्थितपणे करणे, ग्रामसभेमध्ये वारसांची माहिती वेळोवेळी अपडेट करणे आणि सरकारनं वारसा हक्क कायद्याची जनजागृती मोठ्या प्रमाणावर करुन त्याची अंमलबजावणी करणे, या बाबी महिलांना वारसा हक्क मिळवून देण्यासाठी गरजेचं असल्याचंही त्या सांगतात.

# कोणाच्या जीवावर अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले आणि उपायुक्त किशोर गवस यांची मजा?

## बाफाने येथील स्वयंघोषित समाजसेवक महापालिका प्रशासनाला नाचवतोय आपल्या तालावरती! अनधिकृत बांधकामातून मी पणा?

## भ्रष्टाचार करा-भ्रष्टाचार करा' हे ब्रीद वाक्य प्रभाग जी च्या अधिकाऱ्यांनी घेतले मनावर?



वसई विरार शहरात निवडणूकीचे वारे वाहू लागल्याने उत्साही लोकप्रतिनिधी पुन्हा नव्याने स्वतःची प्रचिती निमार्ण करण्यात तल्लीन झाले आहेत. नव नवी विकास कामे याबाबत सविस्तर माहिती गोळा करून शहराचा विकास करण्याचा हेतू साध्य करण्याच्या मार्गाने लोकप्रतिनिधींची वाटचाल सुरू झाली आहे.जनतेने स्वतः जबाबदारीने विचार करून आपल्या प्रश्नांवर कोण खरून उतरेल याबत ठरवलं पाहिजे.कारण निवडणूक तोंडावर वर आली की आम जनता लोकप्रतिनिधी च्या भोंगळ आमिषाना बळी पडत असते.रस्ते नाले तशीच विकास कामे सध्या जोर देत महापालिकेतर्फे सुरू करण्यात आली आहेत .परंतु अनधिकृत बांधकाम या विषयाला अजूनही पालिका प्रशासन दुर्लक्षित करताना दिसत आहेत.त्यामुळे अनधिकृत बांधकाम ही समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत चालली आहे.शिवाय जो तो खाऊन गप्प बसून खुर्ची गरम करत आहेत.यावरून स्पष्ट होत आहे.महापालिका प्रशासनाच्या नाकावर टिचुन बांधकाम व्यावसायिक मोठ्या संख्येने अनधिकृत बांधकामे उभारत आहेत.पालिका अधिकाऱ्यांशी साटलोट करून बांधकाम माफियांनी आपला गोरख धंदा सुरू केला असून सिस्टीम मधील वरून खालपर्यंत सर्व खात असल्याचे त्यांच्याकडून सगळीकडे सांगितले जात आहे.त्यामुळे नवल असे की पालिका भ्रष्टाचार करण्यावर जास्त भर देते हे साध्य झालेले आहे.त्यामुळे पालिका आयुक्तांना आपली जबाबदारी ओळखून अनधिकृत बांधकामाबाबत आदेश जाहीर करणे गरजेचे झालेले आहे.तसेच आयुक्तांशी दफ्तरी भेट घेतली असता त्यांचं अनधिकृत बांधकाम ह्या विषयाबाबत त्यांचं बोट हे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले यांच्याकडे दाखवण्यात येते.त्यामुळे सम्पूर्ण अनधिकृत बांधकाम विषयाची खबरबात मनाले यांच्याकडे असून सुद्धा अधिकाऱ्यांच्या बदल्या घडवून आणण्या व्यतिरिक्त त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची तोडक कारवाई केली जात नाही याची खंत आहे.मनाले यांच्याकडून काडीमात्र कारवाई होण्याची अपेक्षा नसल्याने अर्जदारांमध्ये अस्वस्थ वातावरण आहे.मनाले यांच्या जोडीला उपायुक्त किशोर गवस असून त्यांनी गेले कित्येक वर्षे येथून आपली खुर्ची सोडलेली नाही.शिवाय किशोर गवस यांना वसई विरार महापालिका चांगलीच आवडलेली दिसत आहे.त्यामुळे त्यांना पुन्हा बदली देऊन वसई विरार महापालिकेत पदभार देण्यात आला होता.आयुक्त गंगाधर डी.यांच्या कार्यभाराच्या वेळी त्यांना कंटाळून स्वतः पदभार सोडून गेलेले रमेश आणि किशोर पुन्हा आयुक्त अनिल कुमार पवार यांच्या कार्यकाळात नियुक्त होण्यामागे नक्की कोणते समाजकारण असावे ह्याबाबत खूप सारे प्रश्न निर्माण करत आहेत.यांवर नक्कीच पुढील अंकात सविस्तर सांगण्यात येईल.जी हद्दीतील मुंबई अहमदाबाद महामार्ग बाफाने येथे रेल्वे ब्रिज जवळ सव्हे क्र ३९/२,४०,४२/२ या भूखंडावर एकूण चार लाख चौरस फूट एवढे मोठे इंडस्ट्रीयल अनधिकृत बांधकाम उभे राहिले आहे. येथे विकासाच्या नावावर स्वयंघोषित समाजसेवक अनधिकृत बांधकामे उभारत आहे.पैश्याच्या बळावर पालिका अधिकाऱ्यांना चायपाणी देऊन कारवाई करण्यासाठी आलेल्यानं उलट्या पायी परत पाठवण्यात येते.प्रभाग जी च्या सहआयुक्त मनाली शिंदे यांनी दोन वेळा याठिकाणी पाहणी केली असून दोन्ही वेळा याठिकाणी कारवाई करण्यात आलेली नाही.कनिष्ठ अभियंता तुषार माळी आणि कनिष्ठ अभियंता अरुण सिंग यांना याठिकाणी जाण्यास भीती वाटत असून याठिकाणी लिपिक सुनील टेलगुते यांना पुढे करून मिळेल ते फुल ना फुलाची पाकळी घेतली जात आहे.येथील स्वयंघोषित समाज सेवकाचे संबंध थेट अतिरिक्त आयुक्त रमेश मनाले यांच्याशी असल्याने कनिष्ठ अधिकाऱ्यांची गोची झालेली पाहायला मिळत आहे.तसेच आपल्या धुंदीत मस्त असणारे चिंधी चोर लिपिक विजय नडगे चाळी बांधकाम करून जे मिळेल त्यात खुश आहेत पण आता सध्या या छोट्या चाळी बांधकामात लिपिक सुनील टेलगुते ही हिस्सा मागत असल्याने विजय नडगे निराश असल्याचे सूत्रांकडून समजले आहे.

# गरीब जनतेचा आवाज सोशल तर्फे विविध योजनांचे व इलेक्शन नाव नोंदणी चे शिबीर मोठ्या थाटात संपन्न....



वसई ( प्रतिनिधि ) :- दिनांक १७ फरवरी २०२४ शनिवार रोजी सकाळी १० तेसायंकाळी५ वाजे पर्यंत गरीब जनतेचा आवाज सोशल ग्रुप संस्था चे संस्थापक /अध्यक्ष : मा. श्री. जेरी मच्याडो आणि पालघर जिल्हा अध्यक्ष : श्री. आसिफ नासिर शेख, तसेच श्री. जितेंद्र शिरसाठ (उपाध्यक्ष), श्री.चंद्रकांत कोलते (कार्याध्यक्ष), श्रीमती. जॉजिया शिकवेरा (सचिव), श्रीमती. संगीता भोईर (महासचिव), श्री. रॉकी करवालो (खजिनदार) व गरीब जनतेचा संपूर्ण टीम तर्फे वसईतील जनतेचा मांगणीनूसार दुसऱ्या वेळी मोफत शिबिर ठेवण्यात आला होते. सदर शिबिर मध्ये मोफत आयुष्मान भारत कार्ड, आबा कार्ड, इलेक्शन कार्ड व मुख्यमंत्री वयोश्री योजना ६५ वरील चे नागरिकांना पेन्शन योजना असा मोफत शिबिर भास्कर अली, वसई पश्चिम येथे ठेवण्यात आला होते. सदर शिबिरात भरपूर वसईकरांनी लाभ घेतलं व पुढे पण गरीब जनतेचा आवाज शोसल ग्रूप तर्फे असेच कार्यक्रम नेहमी जनतेच्या सोईसाठी करावे व लोकांसाठी कॅम्प आणि असे विविध योजना आणावे असा लाभार्थ्यांनी आपले मत व्यक्त केले. सदरचे कार्यक्रम हे मा. विजय पाटील, ( विजय पाटील फाऊंडेशन) आणी मा. नितीन पाटील यांच्या मार्गदर्शना खाली करण्यात आला होता.

सदरचे शिबिरा मध्ये पाहुणे म्हणून वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस चे मा. उपाध्यक्ष ,फिरोज इब्राहिम खान, आम आदमी पक्षाचे पालघर जिल्हा प्रभारी वैभव खेडेकर व वसई तालुका प्रभारी इग्निस डीमेलो आणी शिवसेनाचे जेष्ठ नेते मा. मिलिंद खानोलकर व महिला नेत्या मा. नयना वर्तक तसेच भारतीय जनता पार्टीचे अल्पसंख्याक उपाध्यक्ष मुबीन कॉल, भारतीय जनता पार्टीचे प्रतीक चौधरी उपस्थित होते. तसेच सर्व मान्यवर व पत्रकार यांना शॉल ओढून व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. वसईतील पत्रकार मधिल वसई विकास प्रेस तर्फे शहनाज शेख मॅडम, मेमन फास्ट न्यूज तर्फे रफिक मेमन, जुलूम से जंग न्यूज तर्फे नजीर मुलानी व अनेक मान्यवर पत्रकार आणी समाजसेवक सदर कार्यक्रमात उपस्थित होतेष्ठ सदरच्या कार्यक्रमात टोटल ४०० मुख्यमंत्री वयोश्री पेन्शन योजना, ३०० इलेक्शन कार्ड वोटर आयडी, १२०० आयुष्मान भारत कार्ड लोकांनी लाभ घेतला . कार्यक्रम खूप चांगल्या प्रकारे यशस्वी झाला. गरीब जनतेचा आवाज सोशल ग्रुप तर्फे सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले व कार्यक्रमात काम करून व फॉम भरून लोकांना सहकार्य केल्याबद्दल सर्वाचे आभार व्यक्त केले.

बहुजन महा
व्युज अँड न्युज



SNEHA TALKS

लवकरच आपल्या भेटीला येत आहे..

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन तुषार पब्लिकेशन में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.com